# <u>महाराष्ट्र वैद्यकीय परिषद</u>

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ४(१) (ख) नुसार

१. संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्यांची संपूर्ण माहिती.(रचना कार्ये व कर्तव्ये)

भारतीय आर्युविज्ञान परिषदेने वैद्यकीय आचारसंहिता विहीत केली आहे. या आचारसंहितेचे वैद्यकीय व्यवसायींकडून पालन होते किंवा कसे हे पाहणे ही परिषदेची जबाबदारी असल्यामुळे त्या अनुषंगाने वैद्यकीय व्यवसायी विरुध्द या परिषदेकडे अनेक तक्रारी प्राप्त होतात. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ चे कलम २२ अंतर्गत या परिषदेला वैद्यकीय व्यवसायी विरुध्दच्या तक्रारींची चौकशी करुन दोषी वैद्यकीय व्यवसायींना शिक्षा करण्याचे अधिकार देण्यात आले असून यासाठी या परिषदेला समन्यायीक अधिकार प्राप्त आहेत. तसेच, वैद्यकीय व्यवसायी विरुध्दच्या तक्रारींची चौकशी करण्याप्रकरणी दिवाणी न्यायालयात प्रकरणे चालविण्यासाठी विहीत केलेली पध्दती (Civil Procedure Code ) या परिषदेला लागू करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नाव व पत्ता | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई<br>१८९/अे आनंद कॉम्लेक्स, दुसरा मजला, साने गुरुजी मार्ग, ऑर्थर रोड नाका, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-४०००११. |
| कार्यालय प्रमुख | : | प्रबंधक |
| निमशासकीय विभागाचे नाव | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई |
| कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त | : | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ |
| कार्येक्षेत्र / भौगोलिक /कार्यानुरुप | : | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| विशिष्ट कार्ये | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे मुख्य कार्य आधुनिक औषधी पध्दतीमधील वैद्यकीय पदवीधारकांना नोंदणी देणे व अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींवर नियंत्रण ठेवणे. |
| विभागाचे ध्येय / धोरण | : | नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांसाठी आलेल्या आचारसंहितेप्रमाणे नोंदणीकृत व्यवसायीकांवर नियंत्रण ठेवणे |
| कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व कार्यालयीन वेळ | : | ०२२-२३०१०६६८/२३०७२४६४<br>सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वा.पर्यत |
| कार्यालयीन फॅक्स क्रमांक व वेबसाईट | : | ०२२-२३०१०६६८<br>**Website : www.maharashtramedicalcouncil.in** |
| साप्ताहीक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | : | प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार व सर्व शासकीय सुटयांचे दिवशी कार्यालय बंद राहील. |
| वैद्यकीय व्यावसायीकांकरिता नोंदणीची व नुतनीकरणाची वेळ | : | सोमवार ते शुक्रवार<br>सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० पर्यत. |

वैद्यकीय व्यवसायाकांकरिता खालील सेवा ऑनलाईन पध्दतीद्वारे दि.०१.१०.२०१५ पासून सुरु करण्यात आल्या आहेत त्यासाठी वैद्यकीय शुल्क आकारणी तक्ता खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संबंधीत कामे | शुल्क |
|---|---|---|
| १) | तात्पुरत्या वैद्यकीय प्रमाणपत्रांची नोंदणी (Provisional Registration) | ५००/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| २) | कायम वैद्यकीय प्रमाणपत्रांची नोंदणी (Permanent Registration) | २०००/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ३) | पदव्युत्तर पदवी / पदवीका नोंदणी प्रमाणपत्रे (Additional Qualification Registration) | १२०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ४) | पत्र प्रमाणपत्रे (Letter Certificate ) | ७०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ५) | ना हरकत प्रमाणपत्रे (No Objection Certificate | ७०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ६) | भारतीय आर्युविज्ञान परिषदेकडे पाठवावयाचे चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (MCI Good Standing ) | १२०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ७) | इतर देशांतून प्राप्त झालेले संदर्भ (City Form ) | १२०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ८) | महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (Good Standing Certificate ) | १२०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| ९) | नावांत बदल (Change of Name ) | ७०/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| १०) | प्रमाणपत्रांची नक्कल (दूसरी प्रत)<br>Provisional Duplicate Certificate<br>Permanent Duplicate Certificate<br>Additional Duplicate Certificate | १२०/- अधिक प्रक्रीया शुल्क (प्रत्येकी) |
| ११) | दुय्यम ओळखपत्र (Duplicate I - Card ) | १००/- अधिक प्रक्रीया शुल्क |
| १२) | वैद्यकीय नोंदणीचे प्रमाणपत्रांचे नुतनीकरण (Renewal of Registration) | ५००/- अधिक प्रक्रीया शुल्क<br>अधिक विलंब आकार दरमहा१००/- |

२ अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ प्रकरण ४ कलम १४ मध्ये परिषदेच्या प्रबंधकांचे अधिकार / कर्तव्ये व जबाबदारी खाली दिल्याप्रमाणे नमूद केली आहेत.

अ) प्रबंधक हा परिषदेचा सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल. त्याने परिषदेच्या आणि तिच्या कार्यकारी समित्यांच्या सर्व सभांना उपस्थित राहिले पाहिजे. अशा सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांची नांवे व अशा सभातील कामकाज यांचे कार्यवृत्त ठेवले पाहिजे.

ब) परिषदेचे विहीत लेखे ठेवले पाहिजे.

क) प्रबंधकास कर्मचारी वर्गावर पर्यवेक्षकीय अधिकार वापरता येतील.

ड) प्रबंधक हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल.

इ) कर्मचा-यांना स्वतंत्र अधिकार नाहीत.

३ निर्णय प्रक्रीयेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती

क्र.१ नमुद केल्याप्रमाणे

४. कार्ये पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके

१) भारतीय आर्युविज्ञान परिषद अधिनियम १९५६

२) इंडियन मेडीकल कौन्सिल (प्रोफेशनल कन्डक्ट,एटीकेट ॲन्ड इथिक्स)रेग्युलेशन २००२

३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मध्ये नमूद केलेल्या मानकानुसार

५. अधिकारी व कर्मचा-यांची निर्देशिका

अ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५

ब) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम, १९६७

क) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ प्रमाणे

६. प्रत्येक अधिकारी व कर्मचा-याला मिळणारे वेतन

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी | पदनाम | वेतन अधिक ग्रेड वेतन |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय बाळासाहेब देशमुख | प्रबंधक | अतिरिक्त कार्यभार |
| २ | श्री. राजाराम आत्माराम सावंत | उप-प्रबंधक | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० |
| ३ | श्रीमती. उल्का उदय होरांबे | कार्यालयीन अधिक्षक | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० |
| ४ | श्रीमती.रुची राजेश महाडीक | प्रमुख लिपिक रोखपाल | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२०० |
| ५ | रिक्त | वरीष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| ६ | रिक्त | वरीष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| ७ | रिक्त | वरीष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| ८ | रिक्त | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० |
| ९ | रिक्त | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| १० | रिक्त | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| ११ | रिक्त | लघुटंकलेखक (निम्नश्रेणी मराठी /इंग्रजी) | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| १२ | रिक्त | संगणकचालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| १३ | रिक्त | संगणकचालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| १४ | रिक्त | संगणकचालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० |
| १५ | श्री. शरद महादेव घोले | दप्तरी | ४४४०-७४४० ग्रेड वेतन १६०० |
| १६ | श्री. दिनेश बाळू महाडीक | शिपाई | ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३०० |
| १७ | रिक्त | शिपाई | ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३०० |
| १८ | रिक्त | शिपाई | ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३०० |

७. योजनांचा तपशील

या परिषदेद्वारा निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रम (सी.एम.ई प्रोग्राम) एप्रिल २०१० पासून राबविण्यात येत आहे.

८. माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना असणा-या सुविधांचा तपशील

अ) आधुनिक औषधी पध्दतीमधील वैद्यकीय पदवीधारकांना पदवी/पदव्युत्त्तर नोंदणी देणे (उदा.एम.बी.बी.एस)

ब) नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांच्या नोंदणीचे दर ५ वर्षांनी नुतनीकरण करणे

क) नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करणे.

ड) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७,

इ) भारतीय आर्युविज्ञान परिषद अधिनियम १९५६, Indian Medical Council (Professional conduct, Etiquette & Ethics ) Regulations,2002 इत्यादी.

१०. खात्यातील अधिकारी व कर्मचा-यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती भरपाई इ :-

अ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या पदाधिका-यांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बैठकीस उपस्थित राहण्याचा भत्ता व प्रवास भत्ता अदा करण्यात येतो.

ब) या परिषदेच्या वर नमूद कर्मचारी वृदांना शासकीय कर्मचा-यांना देण्यात येणारी वेतन व भत्ते नियमानुसार अदा करण्यात येतात.

११. खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळी उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतूदी व वापर :-
या परिषदेच्या उत्पन्नात वैद्यकीय व्यवसायींकडून प्राप्त होणारी नोंदणी शुल्क ही एकमेव बाब आहे. या परिषदेस राज्य शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. या उत्पन्नातून परिषद पुढील प्रयोजनाकरिता खर्च करण्यास सक्षम आहे :-

अ) परिषदेच्या प्रबंधकाचे /कर्मचारीवृदांचे वेतन व भत्ते व इतर प्रशासकीय खर्च

ब) परिषदेच्या आणि कार्यकारी समितीच्या सभासदांना द्यावयाचा बैठकीचा भत्ता /प्रवास भत्ता न्यायसहायकास द्यावयाचे परिश्रमिक आणि या अधिनियमाखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्याकरिता आवश्यक असतील असे इतर प्रशासकीय खर्च.

१२. सबसिडी उपलब्ध असल्यास ती माहिती कार्यक्रम व लाभार्थीबाबतची माहिती :-
संबंधीत नाही.

१३. सवलती, परवाने,अधिकार याबाबत जे अधिकार आहेत, ती माहिती :-
आधुनिक औषधी (ॲलोपॅथी)पध्दतीमधील, वैद्यकीय पदवीधारकांना (डॉक्टरांना) नोंदणी देणे व नोंदणीकृत व्यवसायीकांविरुध्द रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांकडून किंवा रुग्णाकडून तक्रार प्राप्त झाल्यास महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ च्या कलम २२ अंतर्गत त्याची चौकशी करुन दोषी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांना शिक्षा करण्याचे अधिकार परिषदेला आहेत.

१४. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती :-
अ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे ज्या पदवी /पदवीव्युत्तर वैद्यकीय व्यवसायीकांनी दि.३१.०१.२०१८ पर्यत ज्यांच्या नावांची नोंदणी केली आहे, तसेच ज्या वैद्यकीय व्यवसायीकांनी दि.३१.०१.२०१८ पर्यत त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण केले आहे.
अशा सर्व वैद्यकीय व्यावसायीकांची नांवे /शैक्षणिक अर्हता /पत्ता इत्यादींची यादी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या **www.maharashtramedicalcouncil.in** या वेबसाईटवर जनतेच्या माहितीकरिता प्रसारीत करण्यात आली आहे.

ब) ॲलोपॅथी डॉक्टरांना नोंदणीकरिता आवश्यक असणारी संपूर्ण माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (उदा.आवेदनपत्र, शुल्क त्यासंबंधी इतर माहिती)

१५. नागरिकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा, कार्यालयाची वेळ, लायब्ररीची माहिती इ. :-
नोंदणीकरिता आलेल्या डॉक्टरांना आवश्यक ती मदत केली जाते. डॉक्टरांविरध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत तक्रारदारांना पत्रव्यवहाराद्वारे आवश्यक ती माहिती पुरविणे.

१६. माहिती अधिका-यांची नावे, पदनामे व अन्य माहिती :-

| प्रथम अपिलीय अधिकारी | जनमाहिती अधिकारी | सहाय्यक जनमाहिती अधिकारी |
|---|---|---|
| डॉ. शिवकुमार उत्तुरे<br>अध्यक्ष | श्री. संजय देशमुख<br>प्रबंधक | श्री. राजाराम सावंत<br>उप-प्रबंधक |

१७. खात्याने / संस्थेने निश्चित केलेली अन्य संबंधीत माहिती :-
दि.३१०१.२०१८ पर्यत नोंदणी केलेल्या सर्व डॉक्टरांची नांवे त्यांची शैक्षणिक अर्हता, पत्ते, नोंदणी क्रमांक ज्या विद्यापीठातून पदवी प्राप्त करुन घेण्यात आली त्या विद्यापीठाचे नांव पदवीप्राप्त झाल्याचे वर्ष याबाबतची सर्व माहिती अद्यावत करण्यात आली आहे.

( संजय देशमुख )
प्रबंधक/जनमाहिती अधिकारी
महाराष्ट्र वैद्यकीय परिषद